वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३




# बीडकरांनी बीडमधून पहिल्यांदाच रेल्वेचा आनंद लुटला

## बीडच्या रेल्वे स्थानकातून बीडकरांना घेवून रेल्वे धावली







Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# आजचा हा क्षण इतिहासात नोंद घेतल्यासारखा राहिल

### ज्यांनी ज्यांनी रेल्वे आणण्यासाठी प्रयत्न केले, आंदोलन केले, जेलमध्ये गेले त्या सर्वांना आमचा सलाम

### ह्या.. हू..चेकाळल्यासारखं करताय, कधी सुधारणार तुम्हीं

# अजित पवारांनी बीडमध्ये हुल्लडबाजांना झापलं



बीड, (दिव्य न्युज):-बीड रेल्वे स्थानकाचे आज (१७ सप्टेंबर) लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पणाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह स्थानिक खासदार, आमदार देखील उपस्थित होते. दरम्यान, बीड रेल्वे स्थानकाचे लोकापर्ण झाल्यानंतर अजित पवारांनी भाषण करत बीडमधील विविध मुद्दे मांडले. यावेळी अजित पवारांनी सभेतल्या हुल्लड बाजांचे कानही टोचले.

आजच्यादिवशी फक्त रेल्वेने मोफत प्रवास करायचा. त्यानंतर पुढे नेहमी रेल्वेने तिकीट काढून प्रवास करायचा, असं अजित पवारांनी बीडकरांना म्हणाले. मोफत प्रवास आजच्या दिवसापुरताच आहे, कारण आज उद्घाटन आहे. त्यामुळे चांगल्या सवयी लावा, असं अजित पवारांनी सांगितले. अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, मी मगाचपासून बघतोय..मी महाराष्ट्रात फिरत असतो...वेगवेगळ्या भागात जात असतो...पण तुम्ही असे चिगळल्यात की तुमचे नेते उठले की, ह्या.. हू...अरे कधी रे सुधारणार तुम्ही...मग मी काही बोललो की दादा आले आणि आम्हाला बोलले, असे म्हणाला. अरे जग कुठे चाललंय..जरा आत्मचिंतन करा...कशामध्ये आपण वाद घालतोय...कशासाठी समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण

▶▶ पान २ वर

# खासकरून आमचे मित्र धनंजय मुंडे

### मुख्यमंत्र्यांच्या एका वाक्याने बीडमध्ये होतेय तुफान चर्चा!



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवेच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले भाषण सध्या मोठ्या चर्चेचा विषय ठरले आहे. विकासकामांसह राजकीय संदर्भांनी रंगलेल्या या भाषणात फडणवीस यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा आमचे मित्र असा उल्लेख केला. यानंतर उपस्थित प्रेक्षकांनी जल्लोष केला आणि या एका वाक्यावरून जिल्हाभरात चर्चा सुरू झाली आहे.गेल्या अनेक दशकांपासून बीड जिल्ह्यात रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी होत होती.

▶▶ पान २ वर

# दुपारी वेळ काढतो अन् सिमेंट लावायला, टचअप करायेला येतो


### अजितदादांकडून अधिकाऱ्यांची कानउघडणी

बीड, (दिव्य न्युज):- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड दौऱ्यावरती आहे. बीडच्या जिल्हा रुग्णालयाचा आढावा घेऊन उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्याला सुरुवात झाली. नव्याने उभारण्यात आलेल्या काही विभागाची अजित दादांनी पाहणी केली. काही नियोजित न झालेल्या कामावरून दादांनी डॉक्टरांचीच कान उघडणी केली. छोट्या छोट्या गोष्टी असतात ज्या जिथल्या तिथे ऍक्युरेट केल्या पाहिजेत.. तिथे पण काही तरी झालं एसीच्या खाली काय आहे.. डॉक्टर म्हणतात सिमेंट व्यवस्थित लागलं नाही.. तर मी लावायला येतो, आज

▶▶ पान २ वर

### मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप सुरू

# आधीच शोधून ठेवले होते का?-छगन भुजबळ



मुंबई , (दिव्य न्युज):- मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाचे यश आज पाहायला मिळत असून हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठवाड्यातील मराठा समाजाला ओबीसीतून (जइउ) आरक्षणाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर, लातूर, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यात आज पालकमंत्र्यांच्याहस्ते हे प्रमाणपत्र वाटप केले जात आहेत. लातूरमध्ये पालकमंत्री शिवेंद्रराजे यांच्याहस्ते २ बांधवांना प्रमाणपत्र देण्यात आले. तर, हिंगोली

पान २ वर

### बीडची रेल्वे धावली अन् नेते रुळावर!

# धनुभाऊ- बजरंग बप्पा अन् अजितदादा गप्पात रंगले!



बीड , (दिव्य न्युज):- बीड मधून रेल्वे धावावी हे सर्वसामान्य आणि जिल्ह्यातील सर्वपक्षीय राजकीय नेत्यांचे स्वप्न आज अखेर सत्यात उतरले. अहिल्यानगर ते बीड मार्गावर धावणाऱ्या पहिल्या रेल्वेला आज हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या सोहळयाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते आवर्जून उपस्थित होते. लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीतील जय-पराजयानंतर एकमेकांना पाण्यात पाहणारे नेते एकाच व्यासपीठावर शेजारी बसून गप्पा मारताना दिसल्यानंतर बीडची रेल्वे धावली अन् नेते रुळावर आले असेच म्हणावे लागेल.

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे, माजी मंत्री

▶▶ पान २ वर









# बुरखाधारी महिला चोरांचा पर्दाफाश

## राजस्थान पोलिसांची कारवाई, औरंगाबादमधील मुन्नी परवीन, बुशरा अ.गफूरला अटक

## मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय

औरंगाबाद, (दिव्य न्युज):– राजस्थान शहरातील सोने–चांदी विक्रीच्या भव्य दालनांमध्ये बुरखा घालून दागिन्यांची चोरी करणाऱ्या महिला चोरांच्या टोळीतील दोघींना राजस्थान पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. बायजीपुरा येथील संजयनगर भागात राहणाऱ्या मुन्नी परवीन हुसैन खान आणि छावणीच्या विश्वासनगर भागातील लेबर कॉलनीत राहणाऱ्या बुशरा परवीन अ. गफूर असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपी महिलांची नावे आहेत. या दोन्ही महिला आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. बुरखाधारी चोरट्यांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय राजस्थान पोलिसांनी व्यक्त केला आहे.

औरंगाबाद शहर पोलिसांच्या मदतीने राजस्थान राज्यातील अजमेर पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी तांत्रिक पुराव्याआधारे दोन संशयित महिलांना ताब्यात घेतले होते. या महिलांवर आरोप आहे की, अजमेर येथील चुडी बाजार येथील एन.बी. ज्वेलर्स या दालनातून दहा लाखांचा सोन्याचा हार चोरी केला, दुकान मालकाने तक्रार दाखल केल्यानंतर अजमेर पोलीस ठाण्याचे निरीक्षक धर्मवीर सिंह यांनी सायबर पथकाच्या मदतीने संशयित महिलांचा शोध घेतला असता त्या छत्रपती संभाजीनगर शहरातील असल्याचे सामोर आले. १२ सप्टेंबर रोजी अजमेर पोलिसांची एक टीम शहरात दाखल झाली. या टीमने स्थानिक पोलिसांची मदत घेऊन जिन्सी हद्दीतील बायजीपुरा–संजयनगर येथून मुन्नी परवीन हिला ताब्यात घेतले. त्यानंतर काही वेळानंतर छावणी हद्दीतून बुशरा परवीन हिला अटक करण्यात आली.



### दोन्ही आरोपी सख्खया बहिणी

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार मुन्नी परवीन हुसैन खान आणि बुशरा परवीन या दोघी सख्ख्या बहिणी आहेत. बुशरा परवीन ही आपल्या पतीपासून विभक्त राहते. तर मुन्नी परवीन हिचा पती हुसैन खान हा हत्या प्रकरणातला आरोपी आहे. तो सध्या संचित रजेवर बाहेर आलेला आहे. दोन्ही महिलांचे सराईतांशी संपर्क असल्याचे तपासात समोर आले आहे. या दोन्ही बहिणी अजमेर येथे दर्यात दर्शनासाठी आल्याचे पोलिसांना सांगत आहे.



### चोरी केल्याची कबुली, मुद्देमाल देण्यास नकार

अजमेर ठाण्याचे पोलीस निरीक्षक धर्मसिंह यांनी 'पुण्यनगरी 'शी बोलताना सांगितले की, निखिल सोनी यांचे चुडी बाजार येथे सोने–चांदी विक्रीचे दालन आहे. त्यांनी तक्रार नोंदविली आहे. त्यात त्यांच्या दुकानातून दहा लाख रुपये किमतीचे हार चोरी गेले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ही चोरी दोन बुरखाधारी महिलांनी केल्याचे समोर आले आहे. तपासात ही चोरी छत्रपती संभाजीनगरातील महिला मुन्नी परवीन आणि बुशरा परवीन या दोघींनी केल्याचे तांत्रिक पुरावे मिळाले. त्याआधारे या दोघींना आम्ही शुक्रवारी (दि. १२) अटक केली. दोघींनी चोरी केल्याची कबुली दिली. मात्र, पीसीआरमध्ये त्यांनी मुद्देमाल देण्यास नकार दिला आहे.

### यापूर्वी झाली होती अटक

शहरातील नामांकित ज्वेलरी शॉपमधून हातचलाखीने सोने लंपास केल्याच्या आरोपात या दोन्ही बहिणींना शहर गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी अटक केली होती. चोरी करून सिनेस्टाईल फरार होणाऱ्या या दोन्ही बहिणी रेकॉर्डवर असताना शहर पोलिसांनी मात्र राजस्थान पोलिसांना माहिती उपलब्ध करून दिली नसल्याचे राजस्थान पोलिसांनी सांगितले. मे २०२२ मध्ये यांना अटक करण्यात आली होती, तेव्हा बुशरा परवीन ही रोजेबाग येथे शेख नईमसोबत राहत होती. आता ती आपल्या ओळखपत्रावर अ. गफूर हे नाव लावते. आघाव यांनी या महिलांच्या ताब्यातून तेव्हा चोरीचा लाखो रुपयांचा मुद्देमालसुद्धा जप्त केला होता. या वेळेस मात्र राजस्थान पोलिसांना मुद्देमाल मिळाला नाही.

# बीड शहरातील खासबाग पुलाचे काम अजित दादांनी मार्गी लावावे–डॉ इद्रिस हाश्मी

## उर्दू घर,अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह देखील करण्याची केली मागणी

बीड (दिव्य न्यूज):– बीड शहरातील जनतेसाठी महत्त्वाचा समजला जाणारा खासबाग ते मोमीनपुरा पुलाचे आता पर्यंत दोन वेळा उद्घाटन झालेला आहे हा रस्ता ची अत्यंत आवश्यक असून दोन्ही बाजूच्या परिसरातील लोकांना जोडून ठेवतो या रस्त्याने आमच्या शेतकरी भाजीपाला व फ्रुट आडात मार्केटमध्ये येण्यासाठी फार सोपे आहे व इकडचे भागाचे लोकांना सिविल हॉस्पिटल व विद्यार्थ्यांना स्कूल कॉलेज जाण्यासाठी फार सोपे होणार आंहे आणि त्यांचा वेळ व मेहनत वाचणार आहे त्यामुळे माननीय पालकमंत्री साहेबांनी याच्याकडे लक्ष द्यावे. दुसरी मागणी अशी की उर्दू भाषा हे देशाची भाषा आहे.

स्वतंत्र मध्ये या भाषेचा उपयोग करून आम्ही इंग्रजांबरोबर लढलो आज या भाषेची अवस्था फार खराब झालेली आहे त्यामुळे उर्दू घरचा निर्माण करून उर्दू भाषेला न्याय द्यावा तसेच पूर्वी पासुनची मागणी अल्पसंख्याक मुलीच्या वस्तीग्रह चे



काम रगडले आहे बीडमध्ये अनेक गावातून अल्पसंख्याक मुली शिकण्यासाठी येत आहे परंतु त्यांना आतापर्यंत राहण्यासाठी वस्तीग्रह नाही मागे बीड साठी वस्तीगृह साठी बजेट आला असताना इथले तत्कालीन नगराध्यक्षांनी जमीन उपलब्ध करून दिली नाही म्हणून ते बजेट परळी मध्ये ट्रान्सफर करून वापरण्यात आला आणि अल्पसंख्याक मुली त्या फायद्यापासून वंचित झाले त्यामुळे पालकमंत्री अजित पवार साहेबांनी या अल्पसंख्याक मुलांसाठी वस्तीग्रह उपलब्ध करून देण्याची अत्यंत आवश्यकता आहे याचा विचार करून निधी मंजूर करून द्यावा नगरपालिका ची जागा असून हे अल्पसंख्याक मुलीं वस्तीगृहसाठी उपयोगी ठरणार फक्त या अल्पसंख्याक मुलीला न्याय देण्यासाठी बजेटची आवश्यकता आहे माननीय नामदार आदरणीय अजित दादा पवार साहेबांना विनंती आहे की हे तीन कामे करून बीडची जनता ला न्याय द्यावे असे डॉक्टर हाश्मी माजी नगरसेवक यांनी आपले पत्रक मध्ये म्हटले आहे

# सर्पदंशाने पहिलीत शिकणाऱ्या आठ वर्षीय मुलीचा मृत्यू

किल्लेधारुर (दिव्य न्युज):– तालुक्यातील पहाडी दहीफळ येथे सर्पदंशामुळे एका चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार (दि.१६) रोजी समोर आली. ज्ञानेश्वरी हरीभाऊ नागरगोजे (वय ८) असे मृत मुलीचे नाव आहे. ज्ञानेश्वरी ही पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत होती. अचानक झालेल्या या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.सोमवारी पहाटेच्या सुमारास ज्ञानेश्वरी ही आपल्या शेतातील घरात झोपलेली असताना विषारी सर्पाने तिच्या अंगावर डंख केला. काही वेळानंतर मुलगी वेदनेने तडफडू लागल्याने कुटुंबीयांच्या लक्षात प्रकार आला. घाबरलेल्या कुटुंबीयांनी तातडीने



तिला वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तिची प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी तिला पुढील उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला.रुग्णवाहिकेतून बीडकडे नेत असताना मार्गातच तिची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. अचानक घडलेल्या या घटनेने नागरगोजे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पान ४ वरून

## स्थानिक स्वराज्य

अंतिम प्रभाग रचना कधी?

नगरपालिका आणि महापालिका यांची अंतिम प्रभाग रचना नगर विकास विभागाकडून राज्य निवडणूक आयोगाला चालू महिन्याअखेर सादर केली जाईल असे म्हटले जाते.

एकूण महापालिका – (जालना व इचलकरंजी नवनिर्मित) : २९
प्रशासक असलेल्या महापालिका : २९
एकूण
नगरपरिषदा : २४८
प्रशासक असलेल्या म्हणजे मुदत संपलेल्या व नवनिर्मित नगरपरिषदा : २४८
एकूण जिल्हा
परिषदा : ३४
प्रशासक : ३२
एकूण नगरपंचायती : १४७
प्रशासक असलेल्या म्हणजे मुदत संपलेल्या व नवनिर्मित नगरपंचायती – ४२
प्रशासक असलेल्या एकूण नगरपरिषदा व नगरपंचायती (२४८+४२) : २९०
एकूण पंचायत
समित्या : ३५१
प्रशासक : ३३६
(*भंडारा आणि गोंदिया जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समितींची मुदत मे २०२७ मध्ये संपणार आहे.)

## शिवसेना शिंदे गटाच्या

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रिय पणे प्रचार व प्रसार करील तसेच सर्वांना सोबत घेऊन शिवसेना पक्ष वाढविण्यासाठी सदैव तत्पर राहील असे प्रकाश पवार यांनी संघीतले आहे. या सर्वसामान्य कुटुंबातल्या व एक ग्रामीण भागातल्या कार्यकर्त्याला संधी दिल्यामुळे तालुक्यात चर्चा होत असून तालुक्यातून प्रकाश पवार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बोरीत अतिवृष्टीग्रस्त

जगण्याची उमेद मिळाली, असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले.

आशिष लड्डा यांनी यावेळी सांगितले की, गावकऱ्यांवर आलेल्या या संकटाच्या काळात आपण सर्वांनी एकत्र येऊन त्यांना आधार देणे हे आपले कर्तव्य आहे. शासन मदतीसोबत समाजानेही खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे. आमचा हा छोटासा प्रयत्न त्याचाच एक भाग आहे. स्थानिक नागरिकांनी आशिष लड्डा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनापासून कौतुक केले. आजच्या काळात अशा मदतीची खरी गरज होती. हा उपक्रम बोरीकरांच्या स्मरणात कायम राहील, असे नागरिकांनी सांगितले. अतिवृष्टीच्या तडाख्यात उध्वस्त झालेल्या बोरीत, मदतीच्या या उपक्रमामुळे जनतेत आशेचा किरण निर्माण झाला आहे.

## योग क्षेत्रात उल्लेखनीय

आणि ऑफलाईन योग वर्ग घेऊन अनेक लोकांपर्यंत योग पोहोचवत आहेत. तसेच विविध योग शिबिरे आयोजित करून लोकांमध्ये योगाचे महत्त्व, आरोग्याची जाणीव आणि मानसिक शांततेचा संदेश पोहोचवत आहेत. डॉ. तांबे त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्र, बीड येथे योग प्रशिक्षक म्हणूनही कार्यरत असून ग्रामस्तरावर आरोग्य जागरूकता निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना नियमित योगाभ्यासाची प्रेरणा मिळाली असून त्यांनी आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यास मदत केली आहे. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजासाठी योगाचा प्रसार करणाऱ्या आणि आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करणाऱ्या डॉ. राधा तांबे यांचे योगदान खरोखरच प्रेरणादायी ठरले आहे.

## शेतकऱ्यांना नुकसान

रस्त्यावरील घोलपवस्ती, वाणी वस्तीवरील पूल वाहून गेला, साखरे बोरगाव ता.बीड येथील पुल वाहून गेला, खडकीघाट ते गोगलवाडी – दहिवंडी रस्त्यावरील पूल वाहून गेला, बीड शहरातील मोमीनपुरा येथे घरची पडझड झाली घरात पावसाचे पाणी घुसले, वासनवाडी ता.बीड येथील तलाव फुटला. नागझरी मान्याचावाडा ता. बीड येथील रस्ता व पूल वाहून गेला.

कपिलधारवाडी ता.बीड येथे भूस्खलनाचा धोका निर्माण झाला असून संरक्षण भिंत आणि पूल कोसळला आहे.

नाळवंडी (इजिमा ४६) रस्त्यावरील चिंचोलीमाळी–दहिफळ येथील पुल वाहून गेला.

मोरगाव ता.बीड अंतर्गत जाधववस्ती येथील घरात पाणी घुसले आहे. खडकीघाट ता.बीड येथे घरची पडझड झाली आहे. पिंपळगाव घाट ता. तेलपवस्ती येथील बंधारा कटिंग होऊन शेती वाहून गेली.

शिरूर (का) तालुक्यामध्ये देखील पावसामुळे अनेक ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये खालापुरी–पाडळी – आनंदगाव व पाडळी – तागडगाव–विसावावस्ती पुल वाहून गेला आहे.

भानकवाडी – रौंधवस्ती नदीवरील पूल वाहून गेला. धनगरवाडी करडपट्टीवस्ती नदीवरील जाणारा पूल वाहून गेला आहे. खालापुरी– बेलूरापांदी नदीवरील पूल वाहून गेला. सांगळवाडी–डोळेवाडी नदीवरील पूल वाहून गेला. जांब तागडगाव सातपुते नदीवरील पूल वाहून गेला. हाजीपूर येथील बंधारा व नदी कटिंग होऊन शेती वाहून गेली आहे.

## बांधकाम कामगारनी महाराष्ट्र

गेवराई सोमनाथ पुरी ,शाहीन बाभी पठाण ग्रामपंचायत सदस्य ,हरी नाना भोपळे ,माऊली तळेकर ,सुनील शाहरुख पठाण ,इंजिनिअर अतिक पठाण ,मसूद पठाण दिनानाथ काशीद ,आयुब पठाण ,नसीर भाई पठाण ,नासिर पटेल मदलमोही येथील ग्रामस्त व कार्यक्रमाचे आयोजक जील्हा उपध्यक्ष सय्यद अमेर व सहकारी उपस्थित होते या आरोग्य शिबिर उद्घाटन प्रसंगी रणवीर अमरसिंह पंडित यांनी सर्व कामगारांना मार्गदर्शन आपले मनोगत व्यक्त करताना कामगारांना मोठा आधार मिळावा, त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे तसेच गोरगरीब कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी त्यांची जास्तीत जास्त नोंदणी करण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. कामगारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ कामगारांनी घ्यावा, काही अडचण असल्यास महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना आपल्या पाठीशी खंबीर उभी आहे असे आव्हान रणवीर अमरसिंह पंडित यांनी केले

## जिंतूर तालुक्यातील

मागील १० सप्टेंबरपासून बेपत्ता होता. दरम्यान रविवारी सायंकाळी पाचच्या सुमारास त्याचा मृतदेह जिंतुर तालुक्यातील सायखेडा शेतशिवारातील गट क्रमांक १५२ मधील शेतातील विहीरीत तरंगताना आढळून आला. घटनेच्या एक दिवस अगोदर सदरील युवकाची दुचाकी सायखेडा शिवारात आढळून आली होती. या प्रकरणी मयताच्या भाऊ प्रदिप राठोड याच्या तक्रारीवरून चारठाणा पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच चारठाणा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली. सोमवारी सदर युवकावर त्याच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगळवारी मयत युवकाचे नातेवाईक व इतर ५० जणांनी चारठाणा पोलीस ठाणे गाठून या मृत्यूमागे घातपात असल्याचा आरोप करत खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीना अटक करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान या मागणीवर सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल अंधारे यांनी संबधित युवकाच्या नातेवाइकांना धीर देत सांगितले की मोबाईल सीडीआर व डम डाटा काढून संपूर्ण सखोल चौकशी केली जाईल तसेच तपासातून खुनाचे पुरावे समोर आले तर संबधित प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई केली जाईल असे आश्वासन नातेवाईकांना दिले आहे.

## नुकसानग्रस्त

शेतकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलवले. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार तात्काळ वैयक्तिक आर्थिक सहाय्य देण्याची मागणी केली आहे.

शेख अजिमोद्दीन म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार आपत्ती काळात बाधितांना व मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबांना त्वरित मदत करता येते. हा कायदा आपत्कालीन परिस्थितीत नुकसान कमी करण्यासाठी आणि बाधितांना पुरेसे आर्थिक सहाय्य देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कर्जवसुलीसाठी स्थगिती देणे व नवीन कर्ज उपलब्ध करून देणे हीदेखील तरतूद आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, फळबागा, भाजीपाला, सोयाबीन, ऊडीद, ऊस, मका, कांदा, कांदाचाळ, जनावरे, गायगोठे, घरे, पोल्ट्री फार्म यांचे पंचनामे करून तसेच जिवीतहानी झालेल्या कुटुंबांना तात्काळ अर्थसहाय्य द्यावे. बीड जिल्ह्यातील प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

पान १ वरून

## अजित पवारांनी

करताय?, असं म्हणत अजित पवारांनी बीडकरांना सुनावलं.

रेल्वेमंत्री सुरेश कलमाडी यांच्या काळात या रेल्वेचे भूमिपूजन झाले.आज नवीन ६८ किमी रेल्वे मार्गाची ची सुरुवात आहे. बीडकरांनी या मार्गाला वेळ का लागला याचं निरीक्षण केलं पाहिजे. आज या उद्घाटनाला दोन मोठे योग आहेत. मराठवाडा मुक्तिसंग्राम आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असे दोन योग आहेत. हा मार्ग दोन जिल्ह्यांना जोडणारा नाही, तर लाखो लोकांच्या स्वप्नाला जोडणार आहे. रेल्वे बरोबर विमानतळही करायचं आहे, असं अजित पवार म्हणाले. नको तिथे राजकारण आणू नये, आम्ही भरभरून द्यायला तयार आहोत. पण काम चांगलं झालं पाहिजे. थोड्या थोड्या पैशाकरता सहा विधानसभा मतदारसंघातील कामात थांबले, असतील तर मी पैसे उपलब्ध करून देतो, हे मी मुख्यमंत्र्यांसमोर सांगत आहे, असंही अजित पवार म्हणाले.

आशिया खंडातलं पहिलं ग्रामीण विद्यालय आणि रुग्णालय अंबाजोगाई येथे आहे. माझ्या बीडमधल्या गोरगरिबाला उपचारासाठी पुण्याला जायची गरज पडू नये. परळीला पशुसंवर्धन महाविद्यालय करत आहोत. इथे बसलेले मुंडे भाऊ – बहीण थोडं बजरंग आणि माझं काही ऐकणारे आहेत. आता वाद घालू नका. कुठल्याही विकास कामाला निधी कमी पडू देणार नाही, हे अर्थमंत्री म्हणून सांगतो. दिलेला पैसा सत्कारणी लागला पाहिजे. पैसा चुकीच्या मार्गाने खर्च झाला तर कोणाचीही गय केली जाणार नाही. राजकीय दबाव आला तरी मी आहे, असा इशारा देखील अजित पवारांनी दिला.

## खासकरून आमचे

उल्लेख केला. मात्र, धनंजय मुंडे यांचे नाव घेताना त्यांनी खास करून आमचे मित्र धनंजय मुंडे असं म्हटल्यावर प्रेक्षकांमध्ये टाळ्यांचा गडगडाट झाला. यावरून हा उल्लेख कौतुकाचा होता की, सूचक इशारा, याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

अलीकडेच सरपंच संतोष देशमुख खूनप्रकरणात धनंजय मुंडेंच्या निकटवर्तीयाचे नाव समोर आल्यानंतर त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण जोरदार लावून धरल्याने मुंडे अडचणीत आले. अशा पार्श्वभूमीवर फडणवीसांनी केलेला मित्र हा उल्लेख अनेकांना राजकीय पेचात टाकणारा ठरत आहे.

## दुपारी वेळ काढतो

दुपारी वेळ काढतो.. हे काम तुमचे नाहीत पीडब्ल्यूडीचे आहे.. असं म्हणत अजितदादांनी अधिकाऱ्यांसह डॉक्टरांची पण कान उघडणी गेली. आपण त्यांना पैसे देतो... काही चांगल्या कामावरून दादांनी कौतुक केले. मात्र अधिकाऱ्यांना देखील झापले... तुम्ही खास करून माझे पाहुणे नाहीत कोणीही बूट आणि चप्पल घालून आत यायचे नाही.. असे म्हणत सकाळीच अधिकाऱ्यांवर दादांचा पारा चढलेला दिसला.

अजित पवारांनी नवीन झालेल्या कामाची पाहणी करत होते, त्यावेळी एका ठिकाणी भिंतीवरती त्यांना सिमेंट आणि एसीच्या खालच्या बाजुला थोडा भाग व्यवस्थित लागला नसल्याचं दिसून आलं. त्यावेळी अजित पवार म्हणाले की, जो अचूकपणा असतो. त्या छोट्या छोट्या गोष्टी असतात. फक्त त्या जिथल्या तिथं करायच्या असतात. भिंतीवर तिथं काय झालंय, एसीच्या खाली? तिथे उपस्थित असणाऱ्यांपैकी कोणीतरी उत्तर दिले सिमेंट दिसते, सिमेंट व्यवस्थित झालेलं नाही आहे. त्यावेळी अजित पवार म्हणाले, आज दुपारी मी वेळ काढतो आणि तिथे मी लावायला येतो आणि मी टचअप करायला येतो. हे काम तुमचं नाही. जे कोणी पीडब्ल्यूडीचे इंजिनिअर वगैरे आहे, त्यांची ही कामे आहेत. त्यांना आपण पैसे देतो. महिन्याच्या महिन्याला आपण त्यांना पगार देतो. मी ही डॉक्टरांची काम आहेत तसं म्हणणारच नाही. त्यांच्याकडून आपण कॉन्ट्रॅक्ट घेतो, त्यांची ही कामे आहेत. दरवाज्याची उंची चांगली दिली. बरंच चांगलं काम करण्याचा प्रयत्न केलाय. त्याबद्दल दुमत नाही. त्याबद्दल मी समाधानी आहे. पण बारीक सारीक गोष्टी राहिल्या आहेत, असं अजित पवारांनी म्हटलं आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली व ध्वजारोहण सोहळ्याला अजित पवार उपस्थित राहणार आहेत. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आज १७ सप्टेंबर रोजी बीड येथे हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्याचा आणि ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रियदर्शनी उद्यान येथे सकाळी ८.२५ वाजता हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात येणार असून सकाळी ९.०० वाजता पोलीस मुख्यालय मैदान, बीड येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार ध्वजारोहण करून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

## आधीच शोधून ठेवले

जिल्ह्यात ५० मराठा बांधवांना (चरीरींहर) मराठा–कुणबी ओबीसी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याच, पार्श्वभूमीवर ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा नाराजी व्यक्त केली आहे. आज दिलेली प्रमाणपत्र आधीच शोधून ठेवली होती का, ती योग्य आहेत का? असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.

मराठा समाजाला आज देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्र आधीच शोधून ठेवली होती का ते पहावे लागेल, ती २ सप्टेंबरच्या आधी शोधली होती का, दिलेली पत्र योग्य आहेत का? तेही तपासायला हवे, अशी पहिली प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली. मराठवाड्यात आज हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे पुरावे आढळलेल्यांना मराठा–कुणबी प्रमाणपत्र देत ओबीसीतून आरक्षण देण्यात आलं आहे. त्यामुळे एकीकडे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठवाड्यातील मराठा बांधव आनंदी आहेत. मात्र, दुसरीकडे ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी प्रमाणपत्रावर शंका उपस्थित केल्या आहेत.

मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीची चंद्रशेखर बावनकुळेंनीही काल सांगितलं होतं की, चुकीच्या पद्धतीने जर का प्रमाणपत्रे दिली असतील तर त्यावर कारवाई करू, याचा फायदा कोर्टातही होईल, असे भुजबळ यांनी म्हटले. योग्य प्रमाणपत्र चेक करून दिली असतील तर हरकत नाही, पण खोटी माहिती देऊन चुकीच्या मार्गाने दिली असतील तर माझा विरोध आहे. माझा कुठल्याही समाजाला विरोध नाही, समिती ही शासनाची आहे, सर्वांनी याबाबत भूमिका मांडली आहे, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, अर्जदाराने जात प्रमाणपत्रासाठी अर्ज थेट उपविभागीय अधिकारी म्हणजेच प्रांत कार्यालय यांच्याकडे करावा. त्यानंतर अर्जाची पडताळणी स्थानिक समितीकडे पाठवली जाईल. या समितीकडून वंशावळ तपासणी केली जाईल. त्याचबरोबर जुन्या नोंदी, ग्रामपंचायत दाखले, रहिवासी दाखला, वाडवडिलांच्या नोंदी यांसारखे कागदपत्र तपासले जातील. चौकशीचा अहवाल मिळाल्यानंतर उपविभागीय अधिकारी प्रमाणपत्र देण्याचा अंतिम निर्णय घेतील. यासाठी शासनाने समिती सदस्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचाही निर्णय घेतला आहे. प्रशिक्षणामध्ये जात प्रमाणपत्राच्या नियमावली, चौकशीची पद्धत, अहवाल तयार करण्याची प्रक्रिया या सर्व बाबींचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## धनुभाऊ– बजरंग बप्पा

धनंजय मुंडे, सरकारमधील मंत्री पंकजा मुंडे या जिल्ह्यातील नेत्यांना बीडच्या रेल्वेने एकत्र आणल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या साक्षीने गेल्या दीड – दोन वर्षापासून एकमेकांवर सातत्याने टीका आणि आरोप करणाऱ्या या नेत्यांमध्ये काही काळ का होईना जवळीकता निर्माण झाली. धनुभाऊ–बजरंग बप्पा आणि अजितदादा यांच्यात रंगलेल्या गप्पा आणि हास्यविनोदाने अनेकांच्या भुवयाही उंचावल्या.

आरक्षणाच्या मुद्द्यावरून तापलेले राजकीय वातावरण त्यातून बीड आणि विशेषत: मराठवाड्याच्या अनेक भागात सुरू असलेला मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष त्यातून जातीजातीमध्ये निर्माण झालेली कटुता याचा अनुभव सध्या सर्वसामान्य लोक घेत आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील राजकारणाला वेगळेच वळण लागले. धनंजय मुंडे यांच्या विश्वासातील वाल्मीक कराड व इतरांची नावे या खून प्रकरणात आल्यानंतर त्याचा परिणाम धनंजय मुंडे यांच्या राजकीय कारकीर्दीवर झाला.

आका, त्यांचे नेते पाठीराखा म्हणून मुंडे यांच्यावर टीका आणि आरोप झाले. अगदी मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यासाठी कधीकाळी त्यांच्या मांडीला मांडी लावून बसणारे जुने सहकारी आणि जिल्ह्याचे विद्यमान खासदार बजरंग सोनवणे आघाडीवर होते. संदीप क्षीरसागर यांच्यासह इतर विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी रान पेटवली होते. अखेर धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेऊनच ही मंडळी थांबली. तेव्हापासून खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, भाजपच्या नेत्या मंत्री पंकजा मुंडे यांचा एकाच व्यासपीठावर येण्याचा फारसा योग आला नाही. किंवा आला तरी तो या नेत्यांनी टाळला.

जिल्हा नियोजन समितीची बैठक असो की मग पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातील विकास कामांचे उद्घाटन, लोकार्पण सोहळे असो, एकत्र आले तरी या नेत्यांनी एकमेकांकडे साधा कटाक्ष ही टाकला नाही. हे संपूर्ण जिल्ह्याने बघितले. बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सुरुवातीपासून वरचष्मा राहिला आहे. धनंजय मुंडे हे या पक्षाचे जिल्ह्यातील प्रमुख नेते म्हणून ओळखले जातात. मात्र सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर हे चित्र बदलले. अजित पवारांनाही आपल्या विश्वासू सहकाऱ्याला दूर करून स्वतःच्या हाती बीडची सूत्र घ्यावी लागली.

आपले मंत्रिपद घालवण्यात जिल्ह्यातील ज्या नेत्यांचा सहभाग होता त्या सगळ्यांवर मुंडे यांचा राग आहे. खासदार बजरंग सोनवणे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात असताना धनंजय मुंडे यांनी अनेकदा राजकीय मदत केल्याचे बोलले जाते. अगदी त्यांच्या साखर कारखान्याला सरकारी कर्ज मिळवून देण्यात धनंजय मुंडे यांचा मोठा वाटा होता. राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी मुंडे आणि अजित पवारांची साथ सोडत शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. यावर बीडच्या एका सभेत बोलताना अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना माणसं ओळखता येत नाहीत. बजरंग सोनवणे यांना मदत करू नको, असे मी सांगितले होते पण त्याने ऐकले नाही. तू आता माणसं ओळखायला माझ्याकडून शिक, असा सल्ला तेव्हा मुंडेंना दिला होता.बजरंग सोनवणे यांचा शरद पवारांबरोबर जाण्याचा निर्णय किती योग्य होता हे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीतून दिसून आले. पंकजा मुंडे यांचा पराभव करून बजरंग सोनवणे यांनी दिल्ली गाठली. तेव्हापासून सोनवणे आणि पंकजा– धनंजय या मुंडे बहीण भावापासून ते दुरावले गेले. जिल्ह्याच्या राजकारणात खासदार म्हणून बजरंग सोनवणे यांचा वावर आणि प्रभाव वाढला तर धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद गेल्यामुळे ते नव्याने आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी धडपडत आहेत. पंकजा मुंडे मंत्री झाल्या असल्या तरी जिल्ह्यात विरोधी पक्षाचा खासदार असल्याने त्यांची वाटचाल ही आस्ते कदम सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर आणि जिल्ह्यातील बदललेल्या राजकीय घडामोडी पाहता अहिल्यानगर– बीड रेल्वेच्या उद्घाटन प्रसंगी या नेत्यांचे एकत्र येणे आणि त्यांच्यात संवाद होणे हे शुभ संकेत मानले जात आहेत. बजरंग सोनवणे आणि धनंजय मुंडे हे या कार्यक्रमात एकमेकांच्या शेजारी बसले. एरवी विरुद्ध दिशेला तोंड करून बसणाऱ्या या जुन्या सहकाऱ्यांमध्ये आज संवादही झाला. एकमेकांशी त्यांनी बराच वेळ गप्पा मारल्याने यातून तणाव काहीसा निवळत आहे, ही बाब महत्त्वाची म्हणावी लागेल. बीडच्या रेल्वेसाठी खासदार म्हणून आपण काय प्रयत्न केले, किती निधी आणला हे बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

त्याला फारसा विरोध पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणात केला नाही. परंतु माजी खासदार प्रीतम मुंडे आणि दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासह केशरकाकू क्षीरसागर आणि आतापर्यंतच्या सर्व खासदार आणि जिल्ह्यातील नेत्यांचा उल्लेख त्यांनी केला. श्रेय वादामध्ये न जाता ज्यांनी ज्यांनी बीड रेल्वेसाठी प्रयत्न केले त्या सर्वांचे आभार मानताना पंकजा मुंडे यांनी बजरंग सोनवणे यांच्या नावाचाही उल्लेख केला. बीड जिल्ह्याचे हे बदलते राजकारण येणाऱ्या काळात जिल्ह्याच्या विकासासाठी पूरक ठरणार आहे.

राजकीय मतभेद बाजूला सारून हे महत्त्वाचे नेते यापुढेही एकत्र येतील, अशी आशा आहे. बीड जिल्ह्याची सूत्र पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी हाती घेतल्यानंतर होणारा हा सकारात्मक बदल निश्चितच जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. बीड रेल्वेच्या निमित्ताने व्यासपीठावर सर्वपक्षीय नेते आणि लोकप्रतिनिधी यांच्यात दिसलेले हे खेळीमेळीचे वातावरण यापुढेही कायम राहो, अशाच सर्वसामान्य बीडकरांच्या अपेक्षा असतील.